Date : / /

## यदा यदा ही.....

अगाध किमया, तुझी ईश्वरा, अगाध तव शक्ती ।
निर्मिले जग हे सुंदर किती ॥
आकाशाच्या छत्राखाली, दीपमाळ शत तारकांची ।
झुंबरे किती ग्रह गोलांची ॥
शुभ्र नद्यांचे, वस्त्र ल्यायिली, सालंकृत ही वसुंधरा ।
जीवनदायिनी खरी मधुरा ॥
विशाल शाल, वृक्ष निर्मिले, तृणांकुरांची मखमल ही ।
पर्वत रांगा गगन चुंबीती ॥
अप्रतिम, अद्वितीय निर्मितीचा कळस तू घडविला ।
प्रज्ञावंत मानव तो निर्मिला ॥
बुद्धीबलाने, अफाट शक्तीने त्याने, त्रिभुवन हे जिंकीले ।
परि तया स्वार्थ अन अहंकाराने ग्रासिले ॥
अती संहारक, शस्त्र निर्मिले, हा मानव बहु मातला ।
चालला वंश, निर्वंश करायाला ॥
बघ, आत्मघाती हा भस्मासूर, आता तूच आवर देवा ।
होऊनी, मोहिनी, चमत्कार तो दावा ॥
नातरी होईल, ही सुफलाम सृष्टी, क्षणात नामशेष ।
देवा, ऐका हा अमुचा आक्रोश ॥
यदा यदा ही..... असे म्हणोनी, वचन दिले तू आम्हा ।
घ्यावा अवतार तू पुन्हा ॥
होईल दुष्टांचे निर्दालन, होईल भयमुक्त पुन्हा ही धरणी ।
होतील पुनरपी लीन तुझ्या चरणी ॥
सारे लीन तव चरणी. ॥


सौ. शोभा पांडे
गुरुगणेश नगर, कोथरूड, पुणे
9405438939